P.24 (15)

ISSN 2394-5303

International Peer reviewed Research Journal

# Printing Area

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-91, Vol-01, July 2022



Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

**July 2022, Issue-91, Vol-01**

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

14) Wild Edible plants of Washim District, Maharashtra (India)
**Rathod K. S , K. V. Dugale, Mahur, Nanded** ||65

15) Physicochemical properties of di potassium oxalate in aqua-organic....
**Ajita dixit, Rajim-Nawapara, Raipur (C.G)** ||67

16) सामान्य जनजीवनांची घुसमट : 'जागतिकीरणात माझी कविता'
**प्रा. डॉ. कल्याण गोपणार, परभणी** ||70

17) नव माध्यमे आणि विकास प्रशासन
**डॉ. बबन जोगदंड, डॉ. बालाजी कत्तुरवार, देगलूर** ||74

18) भारतातील वाढती महागाई : एक अभ्यास
**डॉ. मैंद बी.व्ही., ढोकी** ||77

19) दुष्काळावरील निबंधाचा वास्तवदर्शी आणि वैचारिक दस्तऐवज
**प्रा. अंशुमती भास्करराव पेंडोखरे, अंजनगाव सूर्जी, जिल्हा अमरावती** ||80

20) चित्तमपल्लींचे वनातील अनुभव
**डॉ. प्रा. सचिन पाटील, एरंडोल** ||83

21) रुद्र देव का स्वरूप
**मनीषा यादव, जयपुर** ||84

22) कोटपूतली तहसील में जल संसाधन का सतत् प्रबन्धन
**डॉ. राजेन्द्र सिंह यादव** ||88

23) महिला पुलिस की परिवार में निर्णायक भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन
**डॉ. जितेन्द्र कुमार तिवारी, साधना यादव, झाँसी (उ.प्र.)** ||91

24) उच्चतर माध्यमिक स्तर के विद्यार्थियों की शैक्षिक आकांक्षा का तुलनात्मक अध्ययन
**श्रीमती जया तिवारी, हुडको भिलाई नगर** ||94

25) 'आवाज': दमनकारी पुरुपसत्तात्मक व्यवस्था के खिलाफ स्त्री के दो लबों...
**डॉ. रामदास नारायण तोंडे, वसई जिला— पालघर (महाराष्ट्र)** ||98

26) राजस्थान में स्वतंत्रतापूर्व गांधीवादी आंदोलन
**महेश चन्द गुर्जर, जयपुर** ||101

19

# दुष्काळावरील निबंधाचा वास्तवदर्शी आणि वैचारिक दस्तऐवज

प्रा. अंशुमती भास्करराव पेंडोखरे
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सूर्जी, जिल्हा अमरावती

**********

प्रस्तावना :

मराठी साहित्यात वास्तवदर्शी वैचारिक निबंध वाङ्‌मयाची परंपरा खूप मोठी आहे. समाजातील विविध अशा गंभीर प्रश्नांवर हे लेखन झाले आहे. आधुनिक काळात बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले यांच्यापासून आजपर्यंत निघणाऱ्या प्रत्येक वश्त्तपत्राच्या अग्रलेखापर्यंत या परंपरेचा उल्लेख करता येईल. वश्त्तपत्रे, मासिके, साप्ताहिके यांनी समूहातील मूलभूत अषा वास्तवदर्शी, आणि वैचारिक प्रश्नांना समोर ठेवून लेखन केले आहे. आजही हे कार्य निरंतर चालू आहे. अशा प्रश्नांची साधक—बाधक चर्चा केल्याशिवाय समाजाचे व मानवाचे उत्थाण होत नाही. साने गुरुजी यांच्या साधना या साप्ताहिकाने तर गेल्या एक्काहत्तर वर्षापासून स्वत:ला वाहूनच घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून ६ जूलै २०१९ ला प्रसिध्द झालेला, आसाराम लोमटे यांनी लिहिलेला ''दुष्काळाने उसवलेले लोकजीवन'' हा अंक होय. हा अंक म्हणजे समकालातील दुष्काळावरील वास्तवदर्शी अन् वैचारिक निबंधाचा दस्तऐवज आहे. असे या अंकातील आशयसूत्रावरुन स्पष्टपणे म्हणता येईल. हे विषयसूत्र या निबंधाचे आहे.

प्रस्तुत साप्ताहिक साधनाच्या 'दुष्काळाने उसवलेले लोक जीवन' या 'रिपोर्ताज' अंकात एकूण संपादकीय सह नऊ वैचारिक वास्तवदर्शी निबंध आलेले आहेत. ते वैचारिक दृष्टिकोणातूनही महत्वपूर्ण आहेत. याचा विचार आणि आकलन इथे करावयाचे आहे. हिच या निबंधाची मर्यादा आहे. आजचा बहुजन ग्रामावकाशातील समाज, कृषीप्रधान संस्कृतीतील मानव हा दुष्काळामुळे उध्वस्त होतो की काय? एवढी गंभीर समस्या (प्रश्न) निर्माण झाली आहे. म्हणून समकाळात यातील दस्तऐवजाला विशेष महत्त्व आहे असे म्हणता येईल.

दुष्काळावरील निबंधलेखनाची पूर्वपिठीका मराठी निबंध वाङ्मयात खूप मोठी आहे. १९०३ पासून ती सांगण्यात येते. दुष्काळ या विषयाला वाहून घेतलेले साप्ताहिके, मासिके प्रसिध्द झाली आहेत त्यांचा विचार इथे करावयाचा नाही. फक्त साधनाच्या ०६ जूलै २०१९ चा आसाराम लोमटे यांनी लिहिलेल्या अंकातील आशयसूत्रांचा विचार करावयाचा आहे.

या अंकातील संपादकीय असलेला 'दुष्काळाला द्या अर्थ नवा' हा प्रस्तावनावजा विनोद शिरसाट यांनी लिहिलेला लेख आहे. दोन संकल्पनांचा उल्लेख करुन दुष्काळ या गंभीर प्रश्नावर महत्वपूर्ण भाष्य करुन अंकापाठीमागे असलेली भूमिका संपादकाने स्पष्ट केली आहे. गोविंद गोपाळ टिपणीस यांनी १९०३ ला म्हणजे ११५ वर्षापूर्वी दुष्काळावर निबंध लिहिला होता. अर्थशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून त्यांनी मांडलेली दुष्काळाची ११ कारणे या निबंधात आली आहेत. तर 'हिंदूस्थानचा बहुजन समाज म्हणजे शेतकरी वर्ग' या व्याख्येचा आधार घेऊन विनोद शिरसाट यांनी बहुजन समाज या संज्ञेचा नवीन अर्थ (व्याख्या) अतिशय समर्पक शब्दात केला आहे. ते म्हणतात, ''ज्यांना उपजिविकेसाठी नित्याच्या व अत्यावश्यक गरजा भागविणे जड जाते, तो बहुजन समाज अशी सर्वसाधारण व्याख्या रुढ करायला हवी.''(पृष्ठ क्र.१)

या व्याख्येवरुन बहुजन समाज आणि आत्ताची वास्तव स्थिती, गती आणि परिस्थिती यांचा विचार केल्यास अधिक यथायोग्य आहे असे म्हणता येईल. संपादकीय निबंधाच्या शेवटी साधनाने काढलेल्या दुष्काळ या विषयावरील अनिल अवचट, अतुल देऊळगावकर, राहूल कुलकर्णी, राजा शिरगुप्पे यांच्या विशेष लेखनाचा व स्वतंत्र अंकाचा इतिहास सांगितला आहे. दुष्काळाला वाहिलेल्या या सर्व लेखनसंचिताची विचारधारा समोर ठेवून आसाराम लोमटे यांचे दुष्काळ विषयावरील वास्तवदर्शी, मूलभूत आणि वैचारिक लेखनाचा अंतर्भाव

या पुढील आलेल्या आठ निबंधात आहे.

आसाराम लोमटे यांनी हे आठही निबंध प्रत्यक्ष पाहून, खात्री करुन लिहिले आहेत. इथे महानुभाव संप्रदायातील म्हाईंभटाच्या भ्रमंतीची आठवण येते. 'पर्जन्याआधीची पिडा' या छोटेखानी प्रस्तावनावर निबंधात दुष्काळावरील लेखनापाठीमागे असेली भूमिका ते विषद करतात. महाराष्ट्रातील खानदेश, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या प्रादेशिक भूप्रदेशातील दुष्काळाचे भयाणरुप आपण कसे अनुभवले याचे संचित रुप शब्दबध्द करण्याचा प्रयत्न यापुढील निबंधात केलेले आहे. यावरुन आसाराम लोमटे यांच्या निबंधलेखना पाठीमागे असलेली वास्तवदर्शी आणि वैचारिक भूमिका स्पष्ट होते. खरे तर हा दस्तऐवज दुष्काळ किती गंभीर आहे? स्वातंत्र्याची बहात्तर वर्षे तो सोडविण्यासाठी आपण काय केले? योजनांची फसवेगीरी भांडवलदार अन् राज्यकर्त्या वर्गाने कशी चालू ठेवली आहे? यासारख्या असंख्य प्रश्नांची उत्तरे आपल्याला येथून शोधता येतील.

'पाणी कुठवर आलं गं बाई?' या निबंधात नांदेड, बीड, जालना, परभणी यासारख्या जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाणी आणण्यासाठी गेलेल्या किती महिलांचे माणसांचे बळी गेले. वय वर्षे पाच पासून वय वर्षे साठ पर्यंत असलेल्या व्यक्ती या पाणी आणण्यासाठी गेल्यानंतर बळी पडल्या आहेत. पाण्यासाठी संपूर्ण कुटूंबच्या कुटूंब दिवसरात्र तरसत असल्याचे वास्तवदर्शी चित्र या लेखात आले आहे. अनेक गावे, वस्ती, तांडे पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी धावपळ करत आहेत. हे चित्र महाराष्ट्रातील बहुतांश ग्रामीण भागातले आहे. हे सांगताना इतरही अनेक समस्यांचा ऊहापोह या निबंधात येतो.

दुष्काळासारख्या गंभीर प्रश्नावर उपाय म्हणून शासकीय आणि सामाजिक संस्थेच्या पातळीवरती अनेक मार्ग निवडले जातात. पाणी पुरवण्यासाठी टॅंकरची योजना, जनावरांच्या चाऱ्यासाठी छावणी योजना तयार झाली. 'छावणीला पर्याय? संपतरावांना विचारा' या वास्तवदर्शी रिपोर्ताजमधून महाराष्ट्रातील पहिली छावणी १९८४ ला संपतराव पवार यांच्या प्रयत्नातून वलवडी जि. सांगली येथे कशी सुरु झाली या चाराछावणीत प्रति जनावरामागे किती चारा दिला जातो. ती छावणी किती कालावधीपर्यंत चालते याची सर्व माहिती येते. खरे तर आता प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतातच चारा छावणी उघडली पाहिजे. शेत आणि जनावरे यांची तातातूट होता कामा नये यावरील अधिकचा खर्च वाचवायचा असेल तर प्रत्यक्ष जनावरे पाहून शेतकऱ्याच्या खात्यावरच चाऱ्यासाठीचे अनुदान देण्यात यावे असा एक पर्याय ते निबंधातून सुचवितात.

'श्रीमंत गाव, घोटभर पाण्याला महाग' या निबंधात सांगोला तालुक्यातील अजनाळे गावची डाळींब उत्पादकाची हकिकत समोर येते. एकेकाळी डाळींबासाठी प्रसिध्द असलेल्या या गावात सर्व बागा वाळून गेल्या आहेत. डाळींबामूळे इथे मोठमोठी घरे उभी टाकली. माणसांजवळ श्रीमंती आली पण आज हेच गाव पाण्यासाठी महाग झाले आहे. हे वास्तवदर्षी विवेचन हा निबंध करतो. टॅंकरने पाणी आणले, झाडांना दिले पण ते कुठेपर्यंत देणार? जवळची सर्व पुंजी संपली. दहा ते पंधरा किलोमीटरवरुन केलेला पाईपलाईन खर्च वाया गेला.

'म्हसवडच्या चारा छावणीला' पाहून 'जितराबांनी वसलेल गाव' हा निबंध समोर येतो. माणदेशी फाऊंडेशनच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या या चारा छावणीत सर्व जनावरे, शेरडी, कोंबड्या आणि अबालवृध्द यांचे वास्तवदर्षी चित्रण आले आहे. हे सर्व पाहून लेखक म्हणतो, ''आपापल्या जनावरांच्या शेजारीच माणसांनी संसार थाटले होते, जणू जितराबासाठीच हे गाव वसल होतं पाऊस सुरु होईल आणि कांही महिन्यासाठी वसलेल गावं पुन्हा उठेल''

यावरुन छावणीच्या निमित्ताने असे तात्पुरते नवीन वस्ती गावच निर्माण झाले आहे. हे तात्पुरत्या गावाचे भीषण वास्तव आपल्यासमोर येते.

संगोला–जत–सांगली–सोलापूर या प. महाराष्ट्रात फिरताना लेखकाला बनगरवाडी (लेंगरवाडी) त जाण्याचा मोह लेखकाला आवरला नाही. हा सर्व पट्टा दुष्काळाचं रौद्ररुप आपल्यासमोर आणणारा आहे. स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतरही 'बनगरवाडीतला दुष्काळ तेवढा उरलाय' ही सल कायम राहते. कृषिसंस्कृती, ग्रामसंस्कृती सतत येणाऱ्या दुष्काळामूळे पूर्ण उध्दवस्त होते की काय? अशी भीती लेखक व्यक्त करतो.

'पाखरावानी लांबून चारापाणी आणायचं' या निबंधातून मेंढपाळवाल्यांचे गंभीर प्रश्न लेखक मांडतो. कोसोदूरचा मूलूख पायदळी तुडवत असंख्य प्रश्नांच्या गोंगाटात शेळ्या मेंढ्याची खांडची—खांडं भर उन्हात माळराणावरची फक्त झाडच शोधत राहतात. प्रचंड उन्हामुळे जनावरं गाभडणे, पाणी न मिळणे, चारा न मिळणे, लोकर विक्री न होणे आणि उपासमार हे सर्व प्रश्न माणसे व पशु यांच्यासाठी निर्माण होतात. निबंधाच्या उत्तरार्धात ऊसतोड कामगारांचे प्रश्न अतिशय जोरकसपणे येतात. स्थलांतरण झालेल्या कुटुंबातील मुलांच्या शाळेचा प्रश्न, शासकिय योजनेपासून कोसो दूर असलेल्या समाज हा असंख्य अडचणींना तोंड देत आपले जीवन जगतोच. ऊसतोड कामगारांच्या कितीतरी घरांना कुलुपच लावलेली आहेत. एवढेच नव्हेतर मराठवाडा, विदर्भाच्या ग्रामीण भागातून कामासाठी होणारे स्थलांतर हे प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे याचा निर्देश हा निबंध करतो.


'पाताळात जाण्याची स्पर्धा' या निबंधातून माणूस बोअरवेलच्या माध्यमातून भरमसाठ पाणी उपसा कसा करतो आहे. 'ड्रायझोन' म्हणून घोषित झालेल्या पट्ट्यात ही शासकीय अधिकाऱ्यांच्या संगणमताने जमीनीची चाळण होत आहे. इथेही बोर पाडण्यासाठी लाच कशी द्यावी लागते याचे वास्तवदर्शी चित्रण आले आहे. मानवाच्या ओरबडून खाण्याच्या प्रवृत्तीचे दर्शन समाज अन् शासन अशा दोन्ही पातळ्यांवर कसे घडते. यांची अनेक उदाहरणे हा निबंध सांगतो.

शेवटच्या दोन, तीन निबंधात शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत कशा येत नाहीत त्या तात्पुरत्या आणि दिखाऊ कशा आहेत हे सांगितले आहे. शेतीला पूरक असलेला दुग्ध व्यवसाय दुष्काळामूळे कसा कोलमडून पडतो. चारा छावण्या चालवणाऱ्यांची भांडवलदारी लॉबी कशी तयार होते याचे ही विदारक चित्र आसाराम लोमटे यांच्या लेखनात आले आहे. कायम दुष्काळी म्हणून गणला जाणारा मराठवाडा—बीडसारख्या पट्ट्यात ऊस कारखाने कसे चालतात? पक्ष आणि नेते, श्रीमंत लोकांच्या दावणीला कशी बांधली गेली आहे. याचा निर्देशही हा अंक करतो. 'छावणी लॉबी, टॅंकर लॉबी तसेच साखर सम्राटांची लॉबी, रोजगार लॉबी तयार झाली आहे. प्रत्येक पक्ष किंवा नेता (कांही अपवाद सोडून) कोणीही असो परवड मात्र सामान्य माणसाच्या जीवनाची झाली आहे. या पाठीमागे राजकीय वैचारिकतेचा अभाव आणि स्वार्थी, चंगळवादी विचार प्रवृत्तीचा प्रभाव आहे असे आपल्याला म्हणता येईल. याबरोबरच महाराष्ट्रात चालणाऱ्या पाणी टॅंकरची आकडेवारी आपल्यासमोर येते. छावण्या आणि त्यांच्यातील जनावरेही यांची संख्या आपणांसमोर येते. पण वास्तव आकडेवारी ही कांही वेगळीच असते. हेही लेखकास अनुभवावयास मिळाले आहे. त्यांचाही उल्लेख निबंधाच्या पानापानांवर आला आहे. प्रत्येक विभागातील बोलके छायाचित्र प्रत्येक निबंधात देवून शब्दांपेक्षा छायाचित्रातून अधिक दाहक वास्तव आपल्यासमोर येते. छायाचित्रांची केलेली निवड एवढी बोलकी आहे. फळ लागवड योजना, टॅंकर योजना, चाराछावणी योजना, ठिबक योजना, वृक्ष लागवड योजना यांची प्रत्यक्ष किती फसवेगिरी चालू आहे, हेही निबंधाच्या पानोपानी पहावयास मिळते. दुष्काळ मिटविण्यासाठी असलेल्या या तात्पुरत्या मलमपट्ट्या आहेत. कायमस्वरुपी आणि मुलभूत उपाय योजनांची वाणवा आहे असेच यावरुन म्हणता येईल. समाजाने, वाचकाने आणि शासनानेही यातून गंभीर बोध घ्यावा असा हा अंक आहे.

भाशाशैलीच्या दृष्टीकोणातून विचार केल्यानंतर असे म्हणता येईल की आसाराम लोमटे यांची भाषा साधी सोपी सरळ आहे. छोटी—छोटी विधाने आहेत. त्या—त्या प्रादेशिक बोलीच्या संवादाने भाषेला जीवंतपणा आला आहे. जमीनीवर जगत असलेल्या माणसांच्या मनातील अनुभाव तिने यथोचित शब्दबद्ध केला आहे. वरील विश्लेषणावरुन आपल्याला असे म्हणता येईल की, साधनाचा हा ०६ जुलै २०१९ चा अंक हा दुष्काळावरील निबंधाचा वास्तवदर्शी आणि वैचारिक दस्तऐवज आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ :**

साधना — साप्ताहिक, '०६ जुलै २०१९, चा अंक, रिपोर्ताज दुष्काळाने उसवलेले लोकजीवन




IMPACT FACTOR 8.012 iijif

Indexed

**Publisher & Owner**
Archana Rajendra Ghodke

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra)
vidyawarta@gmail.com
Cell : 098 50 20 32 95

**& Edit By**
Dr.Gholap Bapu Ganpat

**ISSN 2394-5303**